O/C

# सराफ चौधरी नगर को-ऑप. हौसिंग सोसायटीज् असोसिएशन लि.

नोंदणी क्रमांक : एमयुएम / एमएचएडीबी / जीईएन / ओ / १३५२३ / २०२२-२०२३ दिनांक : १५ / ०३ / २०२३

O/C अ/०६, ५१-५३, सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

संदर्भ क्र. : SCN ASSOC/117/2024 दिनांक : 16.2.2024

दिपिका
दिनांक - 16/2/24
उपनिबंधक सहकारी संस्था
मुंबई पश्चिम उपनगरे
बांद्रे(पूर्व), मुंबई - ५१.

प्रति,
मा. उपनिबंधक सहकारी संस्था
रूम २११, म्हाडा, बांद्रा (पूर्व) ,
मुंबई- ४०० ०५१.

**विषय :-** सराफ चौधरी नगर को- ऑफ. हौसिंग सोसायटीज असोसिएशन ली. या संस्थेची रविवार दिनांक ०३/०३/२०२४ रोजी सकाळी १०: ३० वा. विशेष सर्वसाधारण सभा आयोजित केलेबाबत.
**संदर्भ :-** आपले पत्र क्र. मुंबई उपनि/ स सं (मुं.प. उ. ) / ६६९/ २०२४ दिनांक १४/०२/२०२४

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस विनंती करणेत येते कि, सराफ चौधरी नगर को- ऑफ. हौसिंग सोसायटीज असोसिएशन ली. या संस्थेच्या सर्व सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०३/०३/२०२४ रोजी सकाळी १०: ३० वा. एससीएन टेनिस ग्राऊंड कांदिवली (पूर्व) येथे आयोजित केली आहे. त्याबाबतची विषय पत्रिका सोबत जोडली आहे.

तरी कृपया आपले कार्यालयाचा प्रतिनिधी सभेसाठी पाठविण्याची व्यवस्था करावी हि विनंती .

सराफ चौधरी नगर को-ऑप. हौ. सोसायटीज असोसिएशन लि. ★ नोंदणी क्र. एमयुएम/एमएचएडीबी/जीईएन/ओ/१३५२३/ २०२२-२०२३

16.2.24
( रघुनाथ बा. दळवी)
सचिव
सराफ चौधरी नगर को-ऑप.हौसिंग सोसायटीज असोसिएशन लि.

# सराफ चौधरी नगर को-ऑप. हौसिंग सोसायटीज् असोसिएशन लि.

नोंदणी क्रमांक : एमयुएम / एमएचएडीबी / जीईएन / ओ / १३५२३ / २०२२-२०२३ दिनांक : १५ / ०३ / २०२३

अ/०६, ५१-५३, सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

संदर्भ क्र. : SCN Assoc. /११५/२०२४ दिनांक : १६/०२/२०२४

**विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस**

प्रति,
श्री. / श्रीमती ---------------------------------
सराफ चौधरी नगर सहकारी गृहनिर्माण संस्था (क्र. ) मर्या.
सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल,
कांदिवली पूर्व, मुंबई - ४००१०१.

महोदय / महोदया,

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट पिटिशन क्र. ३७०२ /२०१९ बाबत दिनांक १६/१२/२०२२ रोजीच्या आदेशानुसार सराफ चौधरी नगर को-ऑप. हौ. सोसायटीज असोसिएशन लि. या असोसिएशनची एकत्रित १४ सभासद संस्थांचा समूह पुनर्विकास करण्यासाठी नोंदणी करण्यात आली असून, सदर असोसिएशन मार्फत १४ संस्थांचा एकत्रित समूह पुनर्विकास करण्यासाठी कलम ७९(अ) अन्वये प्रक्रिया राबविण्यात आली असून असोसिएशनच्या दिनांक २८/०१/२०२४ रोजीच्या व्यवस्थापक समिती सभेत १४ सभासद संस्थांच्या एकत्रित समूह पुनर्विकासाकरिता कलम ७९ (अ) अन्वये विकासक नियुक्तीची विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्याचे अधिकार प्रदान करण्याचा ठराव एकमताने करण्यात आला आहे. त्या नुसार पुनर्विकासाकरिता विकासक नियुक्तीची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०३/०३/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता एससी एन टेनिस ग्राउंड, कांदिवली (पूर्व), मुंबई या ठिकाणी प्राधिकृत अधिकारी यांचे उपस्थितीत घेण्यात येणार आहे. तरी सभेला वेळेवर उपस्थित रहावे हि विनंती. सदर विशेष सर्वसाधारण सभेची विषयपत्रिका खालीलप्रमाणे आहे.

१. पुनर्विकाससंबंधी राबविण्यात आलेल्या प्रक्रियेची माहिती देणे.

२. विकासकांच्या निविदांसंबंधी माहिती / सादरीकरण करणे.

३. इमारत पुनर्विकासासाठी एका विकासकाची अटी / शर्तीसह निवड करुन निविदा अंतिम करणे.

४. निवड झालेल्या विकासकाकडून / त्याच प्रमाणे सभासदांकडून संमती घेणे.

५. पुढील कामकाजाबाबत माहिती देणे व करारनाम्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

६ ज्या बाबींचा विचार करण्यासाठी योग्य नोटीसीची आवश्यकता असते अशा बाबी खेरीज अन्य कोणत्याही बाबींवर कार्यक्रम पत्रिकेवरील विषय संपल्यावर अध्यक्षांच्या परवानगीने विचार करणे.

( रघुनाथ बा. दळवी)
सचिव
सराफ चौधरी नगर को-ऑप.हौसिंग सोसायटीज असोसिएशन लि.

**टीप :- सभेला येतेवेळी प्रत्येक सभासदाने १) दोन फोटो २) आधार कार्ड ३) पॅन कार्ड ४) लाईट बिल ५) शेअर सर्टिफिकेटच्या छायांकित प्रती साक्षांकित (Attested) करून सोबत घेऊन यावेत.**

**सूचना :-**

१. सभेसाठी गणसंख्या एकूण सभासदांच्या २/३ आवश्यक राहील. गणसंख्या पूर्ण न झाल्यास सभा ७ दिवसांसाठी तहकूब करण्यात येईल.

२. सभेस केवळ सभासद / सहयोगी सभासद (मूळ सभासदाच्या परवानगीने) सहभागी होऊन मतदान करु शकतील. याव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस मतदान प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

३. **सभासदांना काही प्रश्न असल्यास ते लेखी स्वरूपात ३ दिवस अगोदर संस्थेच्या प्रतिनिधीकडे द्यावेत.**

४. सभासदांनी सभेस येताना संस्थेचा सभासद असल्याचा पुरावा आणावा फक्त सभासदांना सभेच्या ठिकाणी प्रवेश दिला जाईल.